ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 11 | JULY - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# लाडघर व हर्णे किनाऱ्यावरील समाज



**डॉ. सुरेखा एम. शिंदे**
**पुणे.**




दूर संवेदन व्दारा घेतलले छायाचित्र

## प्रस्तावना

प्राचीन ग्रंथात इसवी सन पूर्व ४थ्या शतकापासून कोकणाचा उल्लेख आढळतो. इ. स.वी सन पूर्व ५ व्या शतकापासून कोकण किनारा पट्टीवरील बंदरातून परदेशी व्यापार १७ व्या शतका पर्यंत चालत होता. आजही काही प्रमाणात कोकण किनारपट्टीवर नौकानयन चालत असल्याचे दिसते. इ.स. १ल्या शतकात लिहीलेले पेरिप्लस या पुस्तकात कोकण किनारपट्टी वरील बंदरासोबत रत्नागिरी जिल्हयातील बंदरांची माहिती मिळते. कोकण किनाऱ्यावरील रत्नागिरी जिल्हयाला प्राचीन काळापासून ऐतिहासिक आणि व्यापारी दृष्टया महत्वाचे स्थान आहे. समुद्राद्वारे व्यापार चालणा–या इतर व्यापारी केंद्रांचा तज्ञांनी केलेल्या संशोधनाचा आधार घेऊन रत्नागिरी जिल्हयातील दापोली तालुक्यातील लाडघर आणि हर्णेच्या संशोधना साठी संपुर्ण क्षेत्राचे सर्वेक्षण केले गेले. लाडघर (३०° ८'२" पुर्वरेखांश व १७° ४२'३०" उत्तर अक्षांश) बंदराचे क्षेत्र दापोली तालुक्यातील बुरोंडी या लहान बंदरापासून ३ कि.मी. अंतरावर उत्तर पूर्व दिशेला आहे. हर्णे ('१७° ४८' ४५" उत्तरअक्षांश ७३° ६'०" पुर्व रेखांश) बंदराचे क्षेत्र दापोली तालुक्यात दापोली पासुन १४ किमी अंतरावर हर्णे आहे. हर्णेच्या वायव्येकडे आंजर्ले आहे. लाडघर व हर्णेच्या संशोधन कार्यात स्थलदर्शक नकाशे, हवाई छायाचित्रण, दूर संवेदन द्वारे घेतलेले छायाचित्र यांच्याद्वारे अभ्यास व भूपुरातत्वीय माहिती घेवून किनाऱ्यावरील भूविवर्तनी घटनांचे कालक्रम शोधले व बंदरांची ऐतिहासिक माहिती मिळवून

पुरातत्वीय पुरावे मिळविले मिळालेल्या धातूच्या वस्तूंचे, मानवी अवशेषांचे, प्राणी अवशेषांचे, गोळा केलेल्या संचनयाचे प्रयोग शाळेत शास्त्रीय पद्धतीने परिक्षण केले. भूभौतिक चाचण्या घेण्यात आल्या व सखोल आणि तुलनात्मक अभ्यासाकरिता सध्या किनाऱ्यावरील असलेल्या वसाहती, जमाती त्यांचे पांरपारिक व्यवसाय यांचे परिक्षण केले.

सर्वेक्षण प्रागैतिहास काळांपासून पूर्व व पश्चिमेकडील देशांचा संबंध समुद्र मार्गानेच भारतातील आला. भारतात ग्रीक बोटीची हालचालीची सुरुवात होण्याआधी देखिल पश्चिम किना-यावरील बंदरातून व्यापार चालत होता. लोधल या ठिकाणी बंदर सदृश्य पुरावे मिळाले आहेत त्याठिकाणी गोदया, व्यापारी साधने, हत्यारे दागिने यांचा सिंधु आणि सुमेरियन त्यांच्यात होत असलेली देवाण घेवाण यांचे पुरावे उत्खननांत मिळाले आहेत. महाराष्ट्रातील दक्षिण कोकणांतील रत्नागिरी जिल्हयाला देखिल समुद्र किनारा हा देणगी स्वरुपातच मिळालेला आहे. रत्नागिरीच्या किनाऱ्यावर अनेक ऐतिहासिक पूरावे आहेत. भारताच्या विविध प्रदेशांमध्ये महाराष्ट्राचे स्थान भौगोलिक सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टया महत्त्वाचे आहे. निरनिराळ्या नदया, डोंगर, समुद्र, यामुळे महाराष्ट्राला स्वतंत्र स्थान प्राप्त झाले आहे. महाराष्ट्रात विविध प्रकारची जमीन हवामान यांचे प्रमाण आहे. त्यामुळे महाराष्ट्रांत स्वत:चे भौगोलिक सामाजिक व सांस्कृतिक व्यक्ती महत्व असणारे जे उपप्रदेश निर्माण झाले त्यापैकी कोकण हे आहे रत्नागिरी जिल्हयात प्राचीन काळांतील बंदरे आहेत अनेक शास्त्रज्ञांच्या मते प्राचीन काळात समुद्रावरील व्यापारातूनच बंदराची निर्मिती झाली.

लाडघर येथे किनाऱ्यावरील भंडारवाडी येथे जवळ वाहणारी लाडघर नदी आणि नदीच्या बाजूला असलेले प्राचीन चंडीका मंदीर व वरच्या मोळयात असलेली किनाऱ्यावरील मुस्लीम वसाहत येथील मुस्लीम लोक परंपरेने समुद्री जीवन आणि त्याच्याशी संबंधित असलेल्या व्यवसायाशी निगडीत आहेत.

हर्णे (हरणाई) येथे किना-यावर मुस्लीम व कोळी वस्ती आहे. येथील लोक परंपरेने मासेमारी करतात. येथे माशांची मोठी बाजारपेठ असून येथून मोठ्या प्रमाणात माशांची निर्यात होत असते. येथे जहाजांना मार्गदर्शन करणारा दिपस्तंभ आहे. येथील समुद्रात सुवर्णदुर्ग किल्ला असून आंग्रेचे ते व्यापारी केंद्र होते. व्यापारी केंद्रासाठी आवश्यक त्या सोयी येथे होत्या. लाडघर व हर्णे येथील किनाऱ्यावरील वाडया व तेथील स्थानीक लोकांचा अभ्यास केला असता येथे किनाऱ्यावर कोळी, भंडारी, कुणबी, सोनकोळी व मुस्लीम जमातीचे लोक आहेत. मासेमारी, मासेमारीसाठी जाळे विणणे, जहाजबांधणी, जहाजांची वाहतूक, हे परंपरागत चालत आलेले व्यवसाय करतात परंपरेने, शेतीचा व्यवसाय करणारा कुणबी हा जाती समुह आहे. ते डोंगर कपारीत राहतात. स्वत:ची शेती करतात काही दुस-यांच्या शेतात मजूरी करतात. लाडघर किनाऱ्यावर येथे आढळणारी जमात म्हणजे भंडारी किनाऱ्यावरील भंडारी पुर्वी ताड़ी विक्रीचा व्यवसाय करत. सदया शेती व मासेमारीची काम करतात नौकानयनाशी भंडाऱ्यांचे नाव प्राचीन काळापासून निगडीत आहे. बौध्दकालीन महानायक ही नौकाध्यक्षाची उपाधी उपभ्रंशाने मायनाक झाली पूर्वी हे लो समुद्रावर चाचेगिरी करीत शिवाजी महाराजांच्या नौदलाच्या आधिकाऱ्यात मायनाक शूर भंडारी होते पुढे आरमार साती बंद झाल्याने मा लोकानी ताठी विकीचा व्यवसाय सुरू केला १६७२ ते १६८१ या काळांतील एका पत्रावरून दिसते की, भंडारी लोक फिरंगी सरकारचे भोंगळी शिंग वाजवणारे शिपाई होते. कोकणातील काही गावांचा कारभार चालवीत. ईस्ट इंडिया कंपनी सैन्यातही ते होते. इ.स. १८७७ मध्ये ताडीवरील कर वाढल्याने बरेच लोक शेती व्यापार व बागायती करू लागले. भंडारी लोक प्रामुख्याने महादेव, शिवनाथ, कालिका, चंडिका इत्यादींची पुजा करतातण

लाडघर येथील श्री. बाळ यांचे कुटुंब चित्पावनापैकी एक आहे. त्यांचे पुर्वज येथे आदिलशहाच्या काळात आले आदिलशहाने ही जागा त्यांना बक्षिस दिली होती. झाडे-झुडपे तोडून, सपाट जमिन करून त्यात शेती करू लागले व त्यांनी घरही बांधले, कऱ्हाडे, देवरूसे चित्पावन

आहेत. लाडघर येथील वसाहतीला भंडारवाडा संबोध्क्षपता हया भंडारवाडयाचे तीन भाग आहेत वरचा मोळा, मधला मोळा, आणि खालचा मोळा हया भंडारवाडयातील संपूर्ण वसाहत करलवर वसलेली आहे

हर्णे येथे सुतार, चांभार, सोनार अशा विविध व्यवसाय करणा-या जमातीच्या वाडया आहेत. पारंपारीक व्यवसायामुळे बंदराच्या तुलनात्मक अभ्यासाठी मदत झाली भोज राजाच्या श्युक्ती कल्पतरूश या ग्रंथात जहाज बांधणी, नौकांचे प्रकार व जहाज बांधणीसाठी काही सूचना केल्या आहेत. ऐतिहासिक काळात जलवाहतूकीला अधिक महत्त्व प्राप्त झालेले दिसते (शिवदे, २००६) सारस्वत, देवरूख, कऱ्हाडे, कमवत, पळणे, चित्पावन, कायस्थ ब्राम्हण ऐतिहासिक काळापासून राहत आलेले आहेत. हर्णे बंदरावर मच्छीमारीचा व्यवसाय करणारी सोनकोळी ही जमात प्रामुख्याने दिसते आहे.

प्रशासनाच्या वेळी सोनकोळी महिलांवर जोबनपट्टी चोळपट्टी नावाचा कर आकारण्यात येत असे (काळदाते व इतर १९९६) महिलांनी अंगात चोळया न घालता अंगभर पदर घ्यावा अथवा घोळया घालणाऱ्या महिलांनी अआंग्रे प्रशासनात कर भरावा असा नियम होता. या जाचक नियमांमुळे सोनकोळयांनी स्थलांतर केले. सोनकोळी पूर्वी मासेमारी व्यतिरिक्त सैनिक, किल्लेदार व लढाऊ जहाजांवर नाविक म्हणून काम करीत सध्या मासे विकी, जाळी विणणे, लहान मासे वाळवून त्यांचे सत्त बनवणे व शेती व्यवसाय करतात.

चांभार **'चर्मकार'** या संस्कृत शब्दापासून आला आहे शिवाचे पुत्र व महाभक्त अरालय यांचे वंशज चांभार स्वत:ला मानतात. आंग्रे घराण्याचे पौरोहित्य कमवत ब्राम्हणाकडे होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यरोहणाच्या प्रसंगी (१६२४) पंडित गागाभट्ट, वाराणशीला गेलेले बाळकृष्ण व रघुनाथ भट्ट हे कमवंत राज्याभिषेक समारंभास गेले होते. दोन्ही अभ्यास क्षेत्रात किनारपट्टीवर आढळणारा एक समाज म्हणजे कोकणी मुसलमान, इस्लामपूर्व काळापासून अरबांचा व्यापार ठाणे, चौल, कल्याण, बाणकोट, दाभोळ या बंदरातून चालत होता. दुसऱ्या सिध्दांतानुसार अरबांचा व्यापार बहरीन, ओमान, कुवेत, इराक, इराण या मध्यपूर्वेकडील देशांतून जलमार्गे कोकण किनारपट्टीशी चालत होता काही येथे स्थायिक होऊन व्यापार करणारे होते तर जलमार्गाने आयात निर्यात करणारा एक वर्ग होता. स्थानिक स्त्रियांशी विवाह केल्याने त्यातून निर्माण झालेली पिढी म्हणजे कोकणी मुसलमान होम अरबांबरोबर आलेल्या सूफी संतांमुळे आकर्षित होऊन हिंदू लोकांनी मुस्लीम धर्माचा स्वीकार केल्याने तांबे, पाटणकर, दिवेकर, उपाध्ये, करंबळेकर ही नावे ही येथील मुस्लीम लोकांच्यात आढळतात. ९व्या आणि १०व्या शतकात राष्ट्रकुट, शिलाहार, व कदंब (दक्षिण कोकण) या राज्यकर्त्यांनी अरब व्यापाऱ्यांना सवलती देऊन त्यांना सरंक्षणही दिलेले होते

१०व्या शतकाच्या सुरुवातीला भारतात आलेला अलमसूदी हया अरब प्रवाशाला सिराफ, बगदाद, ओमान, बसरा येथून आलेले १० हजार अरब चौल येथे स्थायिक झालेले आढळले, इब्नबतूता हा दुसरा प्रवासी याने देखील कोकणातील बंदरांना भेट दिली असता त्यालाही धार्मिक आणि सामाजिकदृष्टच्या चांगल्या अवस्थेत असलेल्या मुस्लीम वसाहती आढळल्या १४व्या शतकापर्यंत अरबी समुद्रातील जलवाहतूकीवर कोकणी मुस्लीमांचा प्रभाव होता. अशा रितीने मध्यमपूर्वेतून आलेले अरब कोकणात आर्थिक आणि सामाजिकदृष्टच्या स्थिर होऊन इतर स्थानिक समाजाशी एकरूप झाले होते. हर्णे, लाडघर, किनाऱ्यावरील मुस्लीम वसाहतीत लोकांचा मुख्य व्यवसाय मासेमारी, बोटी बनवणे, जाळे विणणे, नौकानयन क्षेत्राणी संबंधित आहे.

येथील लोकांची दैवते म्हणजे, गणेश, शिव व भैरोबा आहेत शनि हे मुख्य देवत आहे. बाहेरुन येणा-या लोकांनी आपली दैवते येथे स्थापली आहेत. लक्ष्मी, आशापुरा, चंडीका, पार्मा देवी, सती देवीची पुजा परंपरेने चालत आली आहे. सती गेलेल्या स्त्री च्या आठवणी प्रित्यर्थ्य उभारली आहेत लाडघर या ठिकाणी असलेले चंडीमंदिर हे जुने मंदिर असून येथे दर रविवारी लहान मुले बालउपासना करतात. येथील वसाहत ही भंडारी लोकांची आहे हे लोक येथे सद्या शेती व

मासेमारीचा व्यवसाय करतात नारळाच्या फांदयापासून घरांची छप्परे करण्याचे कामे पावसाळा सुरु होण्याआधी ते करतात भंडारी लोक हे मुख्यत: ताडीचा रस काढणारे आहेत. (महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, २००२) भंडारी शब्द संस्कृत शब्द संभारका म्हणजेच दारू मदिरा गाळणारा यावरुन आला आहे परंतु 'भंडारचा अर्थ सजिना असा देखिल असल्यामुळे हे लोक खजिन्याचे संरक्षक असावेत असे म्हटले जाते. पेशवा भंडारी लोकांचे नाव हे प्राचीन काळापासून नौकानयनाशी जोडलेले आहे. शिवाजी महाराजांच्या काळात 'भंडारी' नौदलाच्या अधिकाऱ्यात महानायक मायनाक पदावर होते. आरमार खाती बंद झाल्यानंतर ते ताडीचा व्यवसाय करु लागले ईस्ट इंडिया कंपनीत ते सैन्यपदावर होते ताडीवरचा कर वाढल्याने त्यांनी व्यापार व बागायती शेती सुरु केली (महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, २००२) हयांचे महादेव, चंडिका कुलदैवत आहेत यावरुन लाडघर येथील नौकानमाशी संबंधित व्यवसाय हे १७ व्या शतकापर्यंत कार्यरत होते. येथे बंदरा संबंधित व्यवसाय असावेतण हर्णे येथे मध्ययुगीन काळातील मशिद आहे लाडघर येथे भंडार वाडयातील एका घराच्या बागेत पीराचे ठाणे आहे, हिंदू देशिन पुजा करतात.

प्राचीन काळात काही या भटक्या जमाती येथे नदी पार करून आल्या कदाचित झाडाच्या ओंडक्यावर दोन्ही कडे पाय टाकून आले असावेत. त्यामुळे प्राचीन काळात मानवाचे जीवन हे नदीतील मासे पकडण्यापुरते राहीले नाही तर पाण्यात पडणाऱ्या व तरंगणाऱ्या झाडाच्या फांदयांमुळे मानवाला जहाजबांधणीची कल्पना आली (रे. ए १९९३, भालेराव, २००७) ओडका पोहारून केलेली होडीतून नयी करू लागला कालांतराने मानव लहान बोटीतून अंतर्गत वहातूक करू लागला, तर मोठ्या जहाजातून कितीतरी टन सामानाची वहातूक करू लागाता (विल्सन, १९४७) सर्वेक्षण करताना असे आढळून आले की मेचील किनार्‍यावर आजही जहाजबांधणी चालते. किनाऱ्यावर छत टाकून जहाजबांधणीची कामे चालत असल्याचे दिसले. जहाजबांधणीसाठी आंबा,

साग, कौर, जांभूळ मांपैकी उपलब्ध असेल ते लाकूड वापरण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.

वरील वर्णनानुसार अभ्यासक्षेत्रात बोटीद्वारे वाहतूक मालत असल्याचे दिसून येते. हर्णे हे आंग्रेच्या काळात व्यापारी केंद्र होते. आंग्रेचे आरमारी केंद्र असल्यामुळे येथून मुध्यनौकाची वाहतूक होत होती (शिवदे २००६) आजही हर्णे येथे बोटीद्वारे वाहतूक चालते अजनवेल मेमून हर्णे येथे लहान बोटीने वांगी आणावी जातात व घेवून दापोली बाजार पेठेत पाठवले जातात लाइपर मेये भंडारी लोक से बोटीद्वारे वाहतूक करणारे होते (महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, २००२) अशा प्रकारचे जहाज बांधणीचे तंत्रज्ञान लाडघर आणि हर्णे येथे किना-मावर अवलंबिले जाते. दोन्ही ठिकाणी किना-यावर जहाज बांधणीचा व्यवसाय देखिल मोठ्या प्रमाणावर चालत असलेला दिसला, येथील जहाज मा मुख्यत. मासेमारीसाठी बनविल्या जातात व वैचे जहाजांमध्ये आधुनिक सोयी असल्याचे दिसून येते व हर्णे येथे किना-यावर दिपस्तंभ आहे. हा व्यवसाय करणारे मुख्यत: कोळी व भंडारी लोक आहेत. लाडघर येथे २५०० वर्षापूर्वी समुद्र संबंधित काही तरी व्यवसाय करणा-या लोकांची ही वसाहत होती.

## समालोचन

या बोनही क्षेत्रांची बंदरासाठी योग्य असल्याचे ठोस पुराव्यांसाठी दुरसंवेदन आणि हवाई छायाचित्रणाद्वारा परिक्षण केले असता येथे मुख्य नदया सहमाद्री पर्वतावरून वहात येऊन पश्चिमेकडे समुद्राला मिळतात. पाण्याचे भरे आढळतात. या क्षेत्रात जांभा सडकाचे प्रमाण अधिक आहे. जलवाहतुकी करिता असलेले पाण्याचे प्रमाण व सोली योग्य आहे. या दोन्ही क्षेत्रात किना-माला लागुन समांतर बैलगाडी मार्ग आहेत. हर्णे आणि लाडघर या दोन्ही क्षेत्राचे संशोधन केले असता वरील किना-यावरील वसाहतीं व तेथील जमाती, त्यांचे पारंपारिक व्यवसाय, त्यांचे सण, दैवते,

किना-यावरील जहाज बांधणी, त्यांचा इतिहास पाहिल्यास हे समुद्रासंबंधित उद्योगधंदे करतात. येथील चांभार गल्ली, सोनारगल्ली, कुंभारवाडा असे वेगवेगळे व्यवसाय करणा-या लोकांच्या वाडया आहेत. यावरून ही दोन्ही क्षेत्रे बंदरासाठी योग्य होती असे प्रकपनि सिध्द होत

## LIST OF REFERENCE BOOKS.

1. Banga, 1. 1992. Ports and Their Hinterland in India (1700 to 1950) -Manhaor publication.
2. Chandra Moti. 1977. Trade and Trade Routes in Ancient India. New Delhi: Abhinav Publications.
3. Chattopadhay, B.D.1999. Ancient and Early Medival Indian Commerce and Trade. Indian Business through the Age. New Delhi: Oxford University Press.
4. Deshpande, C.D.1948. Western India Regional Geography with special Reference of Gujart, Maharashtra and Karnataka. Dharwar:
5. Davidson, A.R. 2010. Introduction of coastal process and geomorphology. Cambridge University International.
6. Guzder, S.J.1980. Quaternary environment and stone age cultures of the Konkan coastal Maharashtra India. Pune: Deccan College Post Graduate and Research Institute.
7. Hebalkar, S. 2001. Ancient Indian Ports with special reference to Maharashtra. New Delhi: Munshiram Manoharlal Publishers.
8. 1962. Ratnagiri District. Maharashtra State Gazetter. Mumbai: Govt. of Maharashtra.
9. Thosar, H.S. 2004. Historical Geography of Maharashtra and Goa, Mysore: Epigraphically Society of India.
10. Shinde, S.M. 2013. Ratnagiritil Puratan Bandry, Maharashtra: Bhupuratatiya Abhyasa. (Unpulished Ph. D. Thesis). Pune: Decca College, Post-Graduate & Research Institute.